# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२६

-----------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२६ / फाल्गुन २०, १९४७ ( शके )**

<table>
<tr><td>(१)</td><td>महसूल मंत्री</td><td rowspan="9">यांचे प्रभारी विभाग</td></tr>
<tr><td>(२)</td><td>वने मंत्री</td></tr>
<tr><td>(३)</td><td>आदिवासी विकास मंत्री</td></tr>
<tr><td>(४)</td><td>कृषी मंत्री</td></tr>
<tr><td>(५)</td><td>सामाजिक न्याय मंत्री</td></tr>
<tr><td>(६)</td><td>रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री</td></tr>
<tr><td>(७)</td><td>मदत व पुनर्वसन मंत्री</td></tr>
<tr><td>(८)</td><td>मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री</td></tr>
</table>

-----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २२**

-----------------------------------

### नंदुरबार जिल्ह्यातील इको पार्क प्रकल्पात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१) * ३००६० श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यात पर्यटन सुविधांची कमतरता असताना पर्यटन स्थळांच्या विकासाच्या नावे काम पुर्ण होण्यापूर्वीच लाखो रुपयांची देयके संबंधित ठेकेदारांना नंदुरबार प्रादेशिक वन विभागाने दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदुरबार इको पार्क प्रकल्पात झालेल्या गैरव्यवहाराच्या तक्रारी निदर्शनास आल्या असून प्रादेशिक वन विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या सदर प्रकल्पात कामाची पूर्तता न करताच ठेकेदारांना देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नंदुरबार जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या विकासाच्या नावे काम पुर्ण होण्यापूर्वीच लाखो रुपयांची देयके देणाऱ्या प्रादेशिक वन विभागाच्या संबंधित दोषी अधिकाऱ्यावर तसेच ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२), (३) व (४) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात नंदुरबार वन विभागात पर्यटन स्थळांचा विकास अंतर्गत कोणत्याही कामाला प्रशासकीय मान्यता प्राप्त नसल्याने कोणतेही कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नसून कोणतीही देयके अदा करण्यात आली नसल्याचे उपमहाप्रबंधक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी कळविले आहे. तथापि, दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात दिनांक १ फेब्रुवारी, २०२६

रोजी नंदुरबारमध्ये ईको पार्क पुर्ण होणे आधी ठेकेदारांना देयके अदा केली अशी बातमी प्रसिध्द झाली होती. सन २०२४-२५ मध्ये (२४०६२२९५) या लेखाशिर्षांतर्गत दुधाळे इको पार्क पर्यटन स्थळाकरीता १ ते ५१ बाबींसाठी शासनाकडून रु.२०४.२९ लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे. त्यानुसार इको पार्कच्या पहिल्या टप्प्यातील कामे विहित मुदतीत पुर्ण करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**केंद्र शासनाच्या ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत फार्मर आयडी कार्ड अनधिकृतपणे तयार करण्यात आल्याबाबत**

**(२) * २३०७१ श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत शेतकरी नोंदणीसाठी फार्मर आयडी ओळखपत्र अनधिकृतपणे तयार करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही राज्यांमध्ये सीएससी सेवा केंद्रे आणि संबंधित संस्था शेतकऱ्यांसाठी भौतिक किंवा ऑफलाईन फार्मर आयडी कार्ड वितरित करीत असले तरी या उपक्रमांतर्गत कोणतेही भौतिक किंवा ऑफलाईन फार्मर आयडी कार्ड अधिकृतपणे मान्य करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन राज्यात अनधिकृतपणे फार्मर आयडी वितरित करणाऱ्या समूहावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ च्या पत्रान्वये काही राज्यामध्ये सी.एस.सी./ सेवा केंद्र व संबंधित संस्थेमार्फत शेतकऱ्यांना फार्मर आयडी दिला जात असल्याचे आढळून आल्याबाबत कळविण्यात आले आहे. ॲग्रीस्टॅक अंतर्गत कोणतेही भौतिक/ ऑफलाईन फार्मर आयडी कार्ड अधिकृतपणे मान्य करण्यात आलेले नाही. याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार दिनाक २४ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व सर्व विभागीय कृषी सहसंचालक यांना ॲग्रीस्टॅक अंतर्गत कोणत्याही संस्थेला फार्मर आयडी कार्ड छापण्याची, वितरित करण्याची किंवा त्याची प्रत प्रसारित करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. याबाबत विविध प्रचार व प्रसिद्धी माध्यमातून व्यापक जनजागृती करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रावेर व यावल (जि.जळगाव) तालुक्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीबाबत**

**(३) * २९२७३ श्री.अमोल जावळे (रावेर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर व यावल (जि.जळगाव) तालुक्यात दिनांक २७ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान अनेक भागात अवकाळी पाऊस झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अवकाळी पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रावेर व यावल (जि.जळगाव) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे पंचनामे पूर्ण करण्यात आले असून, यानुषंगाने मदतीचा शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील माजी सैनिकांना वाटप केलेल्या सिलिंग जमिनी वर्ग २ मधून वर्ग १ करून रूपांतरण अधिमूल्यातुन सूट देण्याबाबत

**(४) * २९५०४ श्री.सुमित वानखेडे (आर्वी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) भोगवटादार वर्ग २ चे वर्ग १ मध्ये रूपांतर करण्याचा नियम दिनांक १४ जानेवारी, २०२६ च्या राजपत्रात प्रसिध्द केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर राजपत्रात वार्षिक दर विवरणाप्रमाणे परिगणना केलेल्या जमिनीच्या मूल्याचा ५० % रूपांतर अधिमूल्य भरणा केल्यानंतरच जमिनीचा भोगवटादार वर्ग १ मध्ये रूपांतरीत करता येईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माजी सैनिकांनी देशासाठी बजावलेल्या सेवा प्रित्यर्थ शासनाकडून जमिनीचे वाटप करण्यात आले असून भोगवटादारासोबत माजी सैनिकांना देखील ५०% रूपांतरण अधिमूल्य आकारले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माजी सैनिकांनी देशासाठी केलेली सेवा लक्षात घेता सदर रूपांतर अधिमूल्यातुन सूट देण्याबाबत किंवा कमीत कमी रूपांतर अधिमूल्य आकारण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने माजी सैनिकांना अधिमूल्यातुन सूट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.
महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (भोगवटादार वर्ग-२ चे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करणे) नियम, २०२६ बाबतच्या प्रारुप नियमांची अधिसूचना दिनांक १४ जानेवारी, २०२६ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) सदर नियम हे अंतिम करण्यापूर्वी प्रस्तुत नियमासंदर्भात जनतेच्या सूचना/आक्षेप/हरकती मागविण्यासाठी प्रारुप नियम प्रसिध्द करण्यात आले असून दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार प्राप्त सूचना/हरकती विचारात घेऊन अंतिम अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही शासन स्तरावर चालू आहे.

-----------------

## कोरची (जि.गडचिरोली) तालुक्यातील झेंडेपार जंगलात सुरू असलेले अवैध लोह खनिज उत्खनन

**(५) * २३५३८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरची (जि.गडचिरोली) तालुक्यातील झेंडेपार जंगलात मोठ्या प्रमाणात लोह खनिज उत्खनन करुन त्याची वाहतूक सुरु असल्याच्या तक्रारीवरुन वन विभागांनी संयुक्त कारवाई करत दिनांक १८ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान एक ट्रॅक्टर जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध उत्खनन करणाऱ्या कंपनीविरुद्ध तसेच या प्रकरणी दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यातील झेंडेपार जंगलात मोठ्या प्रमाणात लोह खनिज उत्खनन झालेले नाही. मात्र मौजा झेंडेपार (ता.कोरची, जि.गडचिरोली) येथील स.ना ८२ आराजी ४६.२५ हे.आर. या क्षेत्रावर ५ खाणपट्टेधारकांना लोह खनिज खाणपट्टा मंजूर करण्यात आलेला आहे. परंतू संबंधित खाणपट्टाधारक यांनी त्यांचे मंजूर क्षेत्रात लोहखनिज उत्खनन कार्य सुरू केलेले नाही. मात्र सदर क्षेत्रातून झाडून खरडून लोह खनिजाचे जास्त प्रमाण असलेले छोटे छोटे दगड जमा करून ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे उचल केलेला लोहखनिज वाहतूक करीत असतांना मौजा झेंडेपार येथील ग्रामस्थांनी पकडलेल्या ट्रॅक्टर संबंधात महसूल विभाग, वनविभाग, पोलीस विभाग यांचेकडून संयुक्त चौकशीअंती सदर प्रकरणात जप्तीनामा करण्यात आलेला असून सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सदरहू ट्रॅक्टर ट्रॉली लोह खनिजासह सुपुर्तनाम्यावर पोलीस स्टेशन, कोरची यांचेकडे सुपूर्त करण्यात आलेला आहे.

(२) तहसीलदार, कोरची यांचे प्राप्त अहवालाचे अनुषंगाने मे. अजंता मिनरल्स व झेंडेपार येथील खाणपट्टाधारक यांचेकडून स्पष्टीकरण मागविण्यात आलेले होते. तसेच, दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी अवैध उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी गठीत जिल्हास्तरीय समितीची बैठक घेण्यात येऊन मे. अजंता मिनरल्स व झेंडेपार येथील खाणपट्टाधारक यांना त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता उपस्थित होते. सदर बैठकीत झेंडेपार येथील क्षेत्रावर लोह सदृश्य खनिज उत्खनन न करता ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये अर्धा ब्रास असल्याचे निरिक्षणे नोंदविण्यात आले. मौजा झेंडेपार (ता.कोरची, जि. गडचिरोली) येथील स.ना ८२ आराजी ४६.२५ हे.आर. मधील विविध खाणपट्टाधारक यांचेकडून तक्रार दाखल केली नसल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी पोलीस स्टेशन, कोरची येथे तक्रार दाखल करण्यात आलेली असून पोलीस विभागाकडून पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच, ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये आढळून आलेल्या लोह सदृश्य खनिजाचे नमुने परिक्षणाकरीता पाठविण्यात आलेले असून त्याचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांमध्ये रासायनिक खतांची चढ्या दराने होत असलेली विक्री

**(६) * २७२६९ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांमध्ये रासायनिक खतांची (विशेषतः युरिया) छापील किंमतीपेक्षा (MRP) अधिक दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२५ मध्ये प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा भरारी पथकाने दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी केलेल्या तपासणीत दशरथ कृषी सेवा केंद्र, केदार कृषी सेवा, वसंत ॲग्रो आणि गजानन कृषी सेवा केंद्र हे युरिया खताची विक्री प्रति बॅग ३२० ते ३२५ रुपये (छापील किंमत २६६ रुपये असताना) या चढ्या दराने विक्री करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हनुमान कृषी सेवा, मातोश्री ॲग्रो आणि शिवकृपा कृषी सेवा केंद्र यांनी साठा उपलब्ध असतानाही शेतकऱ्यांना खत उपलब्ध नसल्याचे सांगून खत नियंत्रण आदेश, १९८५ चे उल्लंघन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भरारी पथकाच्या अहवालानंतर केवळ १५ दिवसांसाठी कृषी सेवा केंद्रावर परवाना निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कृषी विकास अधिकारी हे भरारी पथक प्रमुख असतानाही त्यांना सुनावणी प्रक्रियेपासून दूर ठेवण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील दोषी कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांशी अर्वाच्य भाषेत बोलणाऱ्या जिल्हा गुण नियंत्रण अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२), (३) व (४) होय.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या अध्यक्षतेखालील भरारी पथकाने मौजे नायगाव (जि.नांदेड) येथील रासायनिक खत विक्री करणाऱ्या कृषि सेवा केंद्र धारकाची तपासणी केली. सदर तपासणीचा अहवाल भरारी पथकाने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे सादर केला आहे. त्याअनुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी घेतलेल्या सुनवणीमध्ये मे. दशरथ कृषि सेवा केंद्र, केदार कृषि सेवा केंद्र, वसंत अग्रो सेंटर, गजानन कृषि सेवा केंद्र, हनुमान कृषि सेवा केंद्र, मातोश्री कृषि सेवा केंद्र, शिवकृपा कृषि सेवा केंद्र, नायगाव यांनी खत नियंत्रण आदेश, १९८५ चे खंड ३५ (१) (a) खंड ३ (३) चे उल्लंघन केल्यामुळे त्यांचे परवाने १५ दिवसांसाठी निलंबन करण्यात आले आहे.

(५) नाही. सदर सुनावणीसाठी कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद नांदेड तथा जिल्हा भरारी पथक प्रमुख यांना उपस्थित राहणेसाठी भ्रमणध्वनीवरुन अवगत केले होते, परंतु, माळेगाव यात्रेनिमित्त कृषि प्रदर्शन असल्याकारणाने ते सदर सुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत.

(६) कृषि सेवा केंद्र धारक हे नायगाव तालुक्यातील मुख्य खत पुरवठा धारक असल्यामुळे रब्बी हंगामात शेतकऱ्यांची रासायनिक खतासाठी गैरसोय होऊ नये व नायगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचा खत पुरवठा विस्कळीत न होणेसाठी शेतकऱ्यांचे हित विचारात घेऊन खत नियंत्रण आदेश, १९८५ मधील तरतुदीनुसार सदरील कृषि सेवा केंद्र धारकाचे परवाने १५ दिवसांसाठी निलंबन करण्यात आले आहेत. याबाबत आयुक्त (कृषी) यांना प्राथमिक चौकशी करुन तद्नुषंगाने आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठीचा प्रस्ताव पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## वसई-विरार (जि.पालघर) येथील तुंगारेश्वर अभयारण्यातील जैवविविधतेचा समतोल राखण्याबाबत

**(७) * २४६४९ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) मधील तुंगारेश्वर अभयारण्याला केंद्र शासनाने परिसंवेदनशील क्षेत्र (इको सेन्सिटिव्ह झोन) म्हणून घोषित करूनही सदर झोनमध्ये अनधिकृत बांधकामे, वस्ती यामुळे या क्षेत्राच्या जैवविविधतेचा समतोल राखणे, जंगलातील नैसर्गिक परिसंस्थेचे संवर्धन करुन पर्यावरणीय समतोल टिकविण्यासाठी शासनाकडून कारवाई होत नसल्याने पर्यावरणीय संकटास सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिबटयांचे साम्राज्य म्हणून ओळखले जाणाऱ्या या अभयारण्याला बिबटे आणि वन्यप्राण्यांची संख्या झपाटयाने घटत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये झालेल्या मानवी घुसखोरीमुळे जंगलातील नैसर्गिक अधिवास नष्ट होत असून वन्यजीव मानवी वस्तीच्या दिशेने वावरू लागले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये कोणतेही बांधकाम, खाणकाम व वृक्षतोड अथवा मानवी हस्तक्षेप निषिध्द असतांनाही नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन तुंगारेश्वर अभयारण्यांचे रक्षण, वन्यजीवांची सुरक्षितता आणि पर्यावरणीय समतोल टिकविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१), (२), (३), (४) व (५) केंद्र शासनाने दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्य सभोवताली पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सिटिव्ह झोन) घोषित करण्यात आले आहे. तसेच संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानंतर अनधिकृत बांधकामे, वस्तीबाबत वनविभाग व संनियंत्रण समितीकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून, अवैध व विनापरवाना बांधकामांविरोधात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व वनविभागाकडून कठोर कारवाई करण्यात येते.

सन २०२३-२४ चे प्राणी प्रगणनेनुसार तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यात बिबट्यांची संख्या ३ दिसून आली आहे. तसेच २०२५-२६ ची प्रगणना प्रगतीपथावर आहे. उपलब्ध दस्तऐवजानुसार अभयारण्यात बिबटे आणि वन्यप्राण्यांची संख्या झपाट्याने घटत असल्याचे दिसून आले नाही.

मागील तीन वर्षात जंगलातील नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्याने वन्यजीव मानवी वस्तीच्या दिशेने वावर करत असल्याचा घटना निदर्शनास आलेल्या नाहीत. तसेच तक्रार अथवा वनगुन्हा नोंदविण्यात आले नसल्याचे क्षेत्रीय कार्यालयाने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील सिद्धेश्वर वनविभागात जाळ रेषा काढताना आग लागून झाडे जळाल्याबाबत

**(८) * २९३११ श्री.देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील विजापूर रोड येथील सिद्धेश्वर वन विभागात जाळ रेषा तयार करताना मोठ्या प्रमाणात राखीव जंगलातील झाडे जळाल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी असणाऱ्या वन अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे मोठी पर्यावरणाची हानी झाली असून हजारो झाडे जळून गेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जाळ रेषा काढताना तीन ते सहा मीटर रुंदीची काढणे आवश्यक असताना अधिक मोठ्या जाळ रेषा काढल्याने सदर आग मोठ्या प्रमाणात पसरल्याच्या स्थानिक पर्यावरण प्रेमींनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सोलापूर शहरातील विजापूर रोड येथील सिद्धेश्वर वन विभागात जाळ रेषा तयार करताना मोठ्या प्रमाणात राखीव जंगलातील झाडे जळाल्याने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) हे खरे नाही.

सोलापूर शहरातील विजापूर रोड येथील सिध्देश्वर वन विभागात माहे जानेवारी, २०२६ मध्ये जाळरेषा तयार करण्याचे काम करण्यात आले आहे. परंतू कोणत्याही प्रकारची झाडे जळालेली नाहीत.

(२) हे खरे नाही.

वनक्षेत्रामध्ये जाळरेषा घेण्याचे काम हे १५ डिसेंबर ते १५ फेब्रुवारी या कालावधीत पूर्ण केले जाते. त्यामुळे सिध्देश्वर वनविहार या ठिकाणी जाळरेषा घेण्याचे काम केले असल्याने कोणत्याही प्रकारची झाडे जळालेली नाहीत. तसेच पर्यावरणाची कोणत्याही प्रकारची हानी झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

या क्षेत्रातील जाळरेषा या शासकीय मानकाप्रमाणे घेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे कोठेही अधिक मोठ्या जाळरेषा काढण्यात आलेल्या नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सुरू असलेले अवैध वाळू उत्खनन व वाहतूक

**(९) * २९३६४ श्री.प्रदिप जैस्वाल (छत्रपती संभाजीनगर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यात नवीन वाळू धोरण लागू केलेले असताना जुन्या वाळू धोरणातील शिल्लक वाळूसाठी डेपोधारकांना महिन्याभराची मुदत वाढवून दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गौण खनिज विभागाने दोन महीने उलटूनही मुदतवाढीचे पत्र दिले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, छत्रपती सभांजीनगर जिल्ह्यातील सहा वाळू डेपोमधील १६ हजार ब्रास वाळू शिल्लक असतानाही नागरिकांना परराज्यातून चढ्या दराने वाळू खरेदी करावी लागत असून अवैध वाळू उत्खनन व वाहतूक होत असल्याने शासनाच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

दिनांक १५ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयान्वये वाळू डेपोचा मंजूर कालावधी समाप्त झाल्यानंतर त्या वाळू डेपोमध्ये शिल्लक असलेल्या वाळूच्या विक्रीस १ महिना मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर मुदतवाढीनंतरही डेपोमध्ये वाळू शिल्लक राहील्यास शिल्लक वाळूचा लिलाव करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांना दिल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

दिनांक १५ जुलै, २०२५ च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ६ वाळू डेपोपैकी ४ वाळू डेपोमध्ये शिल्लक असलेली वाळू विक्री करण्यास एक महिन्याची मुदतवाढ दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे.

तसेच मौज-गेवराई, गुंगी ता. फुलंब्री येथील वाळू डेपोची मुदत दिनांक ९ जून, २०२४ रोजी संपल्याने डेपोधारकाने डेपोचा ताबा तहसीलदार, फुलंब्री यांच्याकडे दिल्याने व मौजे-हिरडपूरी ता.पैठण येथील वाळूघाटाबाबत तक्रार असल्याने सदर वाळूडेपो दिनांक २६ मे, २०२५ रोजीपासून बंद करण्यात आला असून या दोन्ही वाळू डेपोस मुदतवाढ देण्यात आली नाही.

वाळू डेपोस अंतिम मुदतवाढीनंतरही वाळू डेपोमध्ये शिल्लक वाळूच्या लिलावाची कार्यवाही जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर कार्यालयामार्फत सुरु आहे.

(४) व (५) तसेच, शासन निर्णय दिनांक ८ एप्रिल, २०२५ नुसार सन २०२५-२०२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील २६ वाळूगटापैकी १० वाळू गटांचे (४२,२५८ ब्रास) लिलाव झाले असून त्यामधून रु.३,६३,४४,७३३/- इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे. उर्वरित वाळूघाटासाठींची ई-लिलाव प्रकीया सुरू आहे. या लिलावामधून वाळू उपलब्ध होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अवैध उत्खनन व वाहतूकीवर कारवाई करण्यासाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर गस्ती पथकांची नियुक्ती करण्यात आली असून दिनांक १ एप्रिल, २०२५ ते २८ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत अवैध वाळू उत्खनन व वाहतूक प्रकरणी १३७ प्रकरणात रु.३,०४,२१,०००/- इतका दंड आकारुन २६ गुन्हे दाखल केले आहेत.

-----------------

**अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खते व इतर निविष्ठा रास्त दरात पुरविण्याबाबत**

**(१०) * २३०६३ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी निविष्ठा विक्रीमधील अनियमितता आढळल्याने तसेच लिंकिंग प्रकरणात अहिल्यानगर जिल्ह्यातील ११ कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्याची कारवाई जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, अहिल्यानगर यांनी केली असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यात रब्बी हंगामात शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण कृषी निविष्ठांचा रास्त दरात पुरवठा होण्यासाठी तालुकास्तरीय गुणनियंत्रण निरीक्षक व भरारी पथक यांच्यामार्फत जिल्ह्यात तपासणी मोहिम हाती घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील तपासणी मोहिमेंतर्गत दोषी कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करून संबंधितांवर कारवाई करण्यासह शेतकऱ्यांना खते व इतर निविष्ठा रास्त दरात पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) होय.

अहिल्यानगर जिल्ह्यासाठी सन २०२५-२६ या वर्षामध्ये २८६००० मे. टम मंजूर असलेल्या खत आवंटनाप्रमाणे व मागणीप्रमाणे खत पुरवठा करण्यात आलेला आहे. त्यानुसार जिल्ह्यामध्ये खतांचा नियमितपणे पुरवठा होत आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये एकुण रासायनिक खत परवानाधारक विक्रेते संख्या ३२५८ आहे. तसेच तालुकास्तरीय गुणनियंत्रण निरीक्षक व भरारी पथकामार्फत जिल्ह्यात निविष्ठा विक्रेते व उत्पादक यांची नियमितपणे तपासणी केली जाते. अहिल्यानगर जिल्ह्यात १४ तालुकास्तरीय गुणनियंत्रण निरीक्षक कार्यरत आहेत. व जिल्हास्तरावर कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय भरारी पथक कार्यरत आहे.

जिल्ह्यामध्ये खतांची लिकींग होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी घाउक विक्रेते, कंपनी प्रतिनीधी यांना बैठकीमधुन सुचना देण्यात आल्या आहेत. कृषि निविष्ठांचा उपलब्ध साठा व भाव फलक, तसेच लिंकींग न करण्याबाबत सूचना फलक प्रत्येक कृषि सेवा केंद्र यांनी दर्शनी भागात लावण्याचे सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सन २०२५-२६ मध्ये जानेवारी अखेर अहिल्यानगर जिल्ह्यात गुणनियंत्रण निरीक्षकांमार्फत कृषि सेवा केंद्राच्या तपासणी मध्ये अनियमितता आढळून आलेल्या एकूण २४ कृषि सेवा केंद्रांवर खत नियंत्रण आदेश, १९८५ चे उल्लंघन केल्यामुळे त्यांचे परवाने निलंबित केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील "बार्टी" कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापकांनी खाजगी शिकवणी संस्थेशी संगनमत करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(११)** * **२६०३१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) "जेईई" व "नीट" या परीक्षेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची गोपनीय माहिती संस्थेच्या कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक यांनी पिरॅमिड टयुटोरिअल्स या खाजगी शिकवणी संस्थेला उपलब्ध करुन दिल्याने शासनाने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने बार्टी संस्थेच्या संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत नोटीस पाठविल्यानंतर कोणतीच कार्यवाही न करता उक्त प्रकरणात आर्थिक (संगनमताने) गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी बार्टीच्या नागपूर कार्यालयाचे सहायक प्रकल्प व्यवस्थापक यांच्याकडून दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजी लेखी खुलासा मागवून घेण्यात आला आहे. सदर खुलाशामध्ये संबंधीत अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची गोपनीय माहिती खाजगी शिकवणीला दिली नसल्याचे म्हटले आहे. शिवाय बार्टीच्या संस्थेच्या स्तरावर माहिती घेवून खात्री केली असता अशा प्रकारची गोपनीय माहिती खाजगी शिकवणीला दिल्याचे

आढळून आलेले नाही. तसेच, या प्रकरणात कुठलाही आर्थिक गैरव्यवहार झालेला नाही. सबब, संबंधित सहायक प्रकल्प व्यवस्थापक यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक शहरातील त्र्यंबकेश्वर मार्गावरील महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षण केंद्र (पीटीसी) समोरील जमिनीच्या खरेदी विक्री प्रक्रियेत झालेली अनियमितता**

**(१२) * २९३३८ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक त्र्यंबकेश्वर मार्गावरील पोलिस प्रशिक्षण केंद्र (पीटीसी) समोरील ६२ एकर वादग्रस्त जमीन सर्व्हे क्रमांक ७५०, ७५१ व ७५५ अंतिम भूखंड क्रमांक ५४१ अंतर्गत शेतजमीन मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ मधील कलम ६३ चे उल्लंघन करुन खरेदी विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नमूद शेतजमिनीवरील व्यावसायिक इमारती, कार्यालये तसेच प्रदर्शनासाठी उभारलेल्या डोममधील सर्व व्यवसाय बंद करण्याचे आदेश शासनाने देऊन देखील सदरचे व्यवसाय सुरुच आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नमूद प्रकरणात मोठया प्रमाणात अनियमितता झाली असून सदर प्रकरणाशी निगडीत अनेक नस्ती गहाळ करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जमिनीचे आजचे बाजारमूल्य हे ५ हजार कोटींच्या जवळपास असून सदर जमिनीवर अनेक बांधकाम व्यावसायिकांचे लक्ष आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

प्रश्नाधिन मिळकती प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील दाखल रिट याचिका क्र.७२८/२०२६ व इतर प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी पारित केलेल्या आदेशातील मुद्दा क्र.४ पुढीलप्रमाणे आहे :-

"In the meanwhile, all the parties shall maintain status quo as it the obtains today. The activities which are being undertaken at the subject premises as of today. shall also continue. till the next date".

सदर आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी पार पडलेल्या सुनावणीअंती कायम ठेवून पुढील सुनावणी दिनांक ९ मार्च, २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे.

(३) अंशत: खरे आहे.

प्रकरणाशी निगडीत टेनन्सी केस क्र.८/२००३ व १०/२००३ प्रकरणी दिनांक २३ जून, २००३ रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशाची नस्ती गहाळ झाल्याने त्याबाबत सरकारवाडा पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे दिनांक १८ फेब्रुवारी, २०२६ रोजी अज्ञात इसमाविरुध्द FIR क्र.००४६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) अंशत: खरे आहे.

मौजे नाशिक ता.जि.नाशिक येथील स.नं.७५०, ७५१ व ७५५ अंतिम भूखंड क्र.५४१ या संपूर्ण क्षेत्राची शासकीय मुल्यांकनानुसार अंदाजे किंमत ही १४४७ कोटी इतकी आहे,

(५) अपर तहसिलदार, नाशिक यांनी दिनांक ७ जानेवारी, २०२६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार मौ.नाशिक ता.जि.नाशिक येथील स.नं.७५०, ७५१ व ७५५ अंतिम भूखंड क्र.५४१ या शेतजमिनीबाबत महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ मधील कलम ६३ चा भंग झालेला असल्याने संबंधित व्यवहार सदर अधिनियमाच्या कलम ८४-क अन्वये "विधीअग्राह्य" असल्याचे निष्कर्ष नोंदवून सदर मिळकत शासन जमा करण्याबाबत आदेश पारित केले आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत सदर मिळकतीच्या अभिलेखात "महाराष्ट्र शासन" असे नाव दाखल करण्यात आले आहे.

-----------------

## नरखेड (जि.नागपूर) येथील शेतकऱ्यांचे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(१३) * २९६११ श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत ठिबक व तुषार सिंचन योजनेकरिता शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते या योजनेंतर्गत नरखेड (जि.नागपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२३-२०२४ या वर्षीचे अनुदान मिळाले नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत अनेक शेतकऱ्यांनी उक्त संच बसविले असताना १५५ शेतकऱ्यांना एकूण ३३ लाख ७७ हजार ८३३ रुपयांचे अनुदान प्राप्त झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत उक्त तालुक्यातील संबंधित शेतकऱ्यांचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रती थेंब अधिक पिक सन २०२३-२४ अंतर्गत नागपूर जिल्हयातील एकूण २४७३ इतक्या लाभार्थींना पूर्व संमती देण्यात आलेली असून, त्यांनी ठिबक व तुषार संच बसविलेले आहेत. त्याकरिता रु.१०६०.७७ लाख अनुदान देय होते. त्यामध्ये नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्याचा समावेश असून, तालुक्यातील एकूण ३९८ लाभार्थींना पूर्वसंमती देण्यात आली होती. त्याकरिता रु.७६.१४ लाख अनुदान देय होते. नरखेड तालुक्यातील सन २०२३-२४ मध्ये २१ लाभार्थींना रु.३.६९ लाख, सन २०२४-२५ मध्ये ३१८ लाभार्थींना रु.६१.५५ लाख आणि सन २०२५-२६ मध्ये ५९ लाभार्थींना रु.१०.९० लाख असे एकूण ३९८ लाभार्थींना ७६.१४ लाख इतके अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

सद्य:स्थितीत या योजनेंतर्गत संच बसविलेल्या कोणत्याही लाभार्थींचे अनुदान अदा करण्याचे प्रलंबित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाराशिव जिल्हयातील ॲग्री स्टॅक योजनेंतर्गत रब्बी पिकांच्या नोंदणीतील तांत्रिक अडचणी दूर करून शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत

**(१४)** ***३०४४८ डॉ.तानाजी सावंत (परांडा):** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) धाराशिव जिल्ह्यातील रब्बी पिकांच्या ॲग्री स्टॅक योजनेंतर्गत दिनांक १० डिसेंबर, २०२५ पासून ई-पीक पाहणीची मोहीम ॲपव्दारे राबविण्यात येत आहे मात्र तांत्रिक अडचणीमुळे जिल्ह्यातील फक्त १० टक्केच शेतकऱ्यांची ई-पिक पाहणी झाली असून अद्यापही ९० टक्के शेतकरी या योजनेपासून वंचित असल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक विमा, नैसर्गिक आपत्तीत मिळणारी नुकसान भरपाई आणि पीक कर्जासाठी सातबाऱ्यावर पिकाची नोंदणी असणे अनिवार्य असून दिनांक १० मार्च, २०२६ रोजीपर्यत ही प्रक्रिया पूर्ण न झाल्यास शेतकरी शासकीय लाभापासून वंचित राहणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्यामुळे या योजनेबाबत शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे ॲग्री स्टॅक योजनेंतर्गत येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करून शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

रब्बी हंगाम सन २०२५-२६ अंतर्गत धाराशिव जिल्ह्यात एकूण पीक पाहणी क्षेत्रापैकी २१.०२ टक्के क्षेत्रावरील पिकांची नोंद करण्यात आली आहे.

(२) कृषि विभागाचा शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ मधील तरतूदीनुसार हंगामाच्या सुरूवातीला ४५ दिवस शेतकरी स्तरावरून पीक पाहणी करण्यात येते. शेतकरी स्तरावरून पीक नोंदणीचा कालावधी समाप्त झाल्यावर सहाय्यक स्तरावरून पीक नोंदणी करण्याची तरतूद आहे.

राज्यात रब्बी हंगाम सन २०२५-२६ अंतर्गत शेतकरी स्तरावरून पीक नोंदणीसाठी दिनांक १० डिसेंबर, २०२५ ते २४ जानेवारी, २०२६ हा कालावधी तसेच सहाय्यक स्तरावरून पीक पाहणीसाठी दिनांक २५ जानेवारी, २०२६ ते १० मार्च, २०२६ हा कालावधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(३) व (४) ई-पीक पाहणी मोबाईल ॲपवर नाव नोंदणी ही प्रक्रिया शेतावर जाऊन करण्याची गरज नसून केवळ नाव नोंदणी करण्यासाठी इंटरनेट सुविधा आवश्यक आहे. तसेच नाव नोंदणीची प्रक्रिया केवळ एकदाच करावी लागते.

पीक पाहणी करतेवेळी नेटवर्क मिळत नसणे व इतर तांत्रिक अडचणी या तात्पुरत्या स्वरूपाच्या असून त्या तात्काळ दुरुस्त केल्या जातात. तसेच पीक पाहणी करतेवेळी नेटवर्क नसतानाही शेतातील पीकांचा फोटो काढून नंतर नेटवर्क क्षेत्रात आल्यावर अपलोड करून पीकाची नोंदणी करता येते. प्रत्यक्ष शेतामध्ये पीकांची नोंद करण्यासाठी इंटरनेटची आवश्यकता नाही. एक मोबाईल हँडसेट वरुन १०० खातेदारांची नाव नोंदणी करून पीक पाहणी नोंद करता येते. शेतकऱ्यांना पीक पाहणी नोंद करणेकरीता प्रत्येक गावात सहाय्यक यांची नेमणूक करणेत आलेली आहे. राज्यस्तरावर शेतकऱ्यांकरीता हेल्पलाईन कक्षामार्फत (हेल्पलाईन क्रमांक ०२०-२५७१ २७१२) सुध्दा तांत्रिक अडचणींचे निवारण केले जाते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यात आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये आकारले जाणारे अतिरिक्त शुल्क

**(१५) * २४५८६ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये विविध दाखले, प्रमाणपत्रे व सेवा मिळविण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा २०० ते ३०० रुपये अतिरिक्त शुल्क नागरीकांकडून आकारले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दाखल्याची दर सूची केवळ नावापुरती उपलब्ध असून प्रत्यक्षात केंद्र चालकांकडून मनमानी पद्धतीने अतिरिक्त रक्कम घेतली जात असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आपले सरकार सेवा केंद्रांवर आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबत तहसीलदार व संबंधित अधिकाऱ्यांकडून देखरेख, तपासणी व नियंत्रण न ठेवल्यामुळे नियमांचे उल्लंघन होऊन शासनाच्या लोकाभिमुख सेवेच्या उद्दिष्टांनाच बाधा निर्माण होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात आजपर्यंत आपले सरकार सेवा केंद्रांविरोधात किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी किती तक्रारींवर कारवाई करण्यात आली आहे, तसेच अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या केंद्रांवर कोणती दंडात्मक किंवा प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये एकसमान दरसूचीचे सक्तीने प्रदर्शन, ऑनलाईन पेमेंटची अंमलबजावणी, नियमित तपासणी व तक्रार निवारण यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये विविध दाखले, प्रमाणपत्रे व सेवा मिळविण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अतिरिक्त शुल्क आकारलेबाबत चंद्रपूर जिल्ह्यात २, अहिल्यानगर जिल्ह्यात ४३३, धुळे जिल्ह्यात ३, रायगड जिल्ह्यात १, लातूर जिल्ह्यात १ व बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई तालुक्यातील केंद्रांबाबत १ तक्रार अशा एकूण ४४१ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३), (४) व (५) आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये विविध दाखले, प्रमाणपत्रे व सेवा मिळविण्यासाठी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशीअंती चंद्रपूर जिल्ह्यात २, अहिल्यानगर जिल्ह्यात ७, लातूर जिल्ह्यात १ केंद्र निलंबित करण्यात आले आहेत. तसेच धुळे जिल्ह्यातील ३, रायगड जिल्ह्यातील १ आणि बीड जिल्ह्यातील ६ आपले सरकार केंद्रे कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद तरतुदीनुसार सर्व आपले सरकार सेवा केंद्रांची तपासणी दरवर्षी नियमितपणे केली जाते. सदर शासन निर्णयातील तरतूदींचे उल्लंघन आपले सरकार सेवा केंद्राकडून झाल्याचे निदर्शनास आल्यास आपले सरकार सेवा केंद्राचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असून जिल्हाधिकारी स्तरावर कारवाई करण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### मेळघाट व्याघ्र प्रकल्पात विहिरी खोदण्याच्या 'कूप' वाटप प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(१६) * ३०७६५ श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पात (सन २०२५-२६) विहिरी खोदण्याच्या कामांशी संबंधित 'कूप' वाटप प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहकारी संस्थेने बनावट लेखापरीक्षण अहवाल आणि बनावट पावत्या सादर करुन शासनाची दिशाभूल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी सहकारी संस्थेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) व (२) प्रश्नातील उल्लेखित मुद्दा हा मेळघाट व्याघ्र प्रकल्पात विहिरी खोदण्याशी संबंधित नसून मेळघाट प्रादेशिक वन विभागांतर्गत जंगल कामगार सहकारी संस्थेस वर्ष २०२५-२६ करीता वनोपज निष्कासनासाठी वाटप करण्यात आलेले कूपांशी निगडीत आहे. तारूबंदा सहकारी संस्थेने सदरची कामे बनावट कागदपत्रांच्या आधारावर मिळविली असल्याबाबतची तक्रार माहे जानेवारी, २०२६ मध्ये प्राप्त झाली आहे.
(३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतूदीनुसार चौकशी करून अहवाल सादर करण्यासंबंधी सहायक निबंधक, अचलपूर यांना आदेशित केले आहे. या प्रकरणी तारूबंदा सहकारी संस्थेस वाटप करण्यात आलेले दोन कूपांचा ताबा वनविभागाने परत घेतलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरमधील मागासवर्गीयांना शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत

**(१७) * २५६६४ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर हे देवस्थान इनाम जमिनीवर वसलेले असून या ठिकाणी अनेक वर्षापासून मागासवर्गीय वस्ती असून सदर वस्तीतील कुटुंबियांना इतरत्र कुठेही स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीवर सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेली घरे मातीची असल्यामुळे धोकादायक अवस्थेत असून या भागात सुमारे १४२ सातबारा उतारे असून त्यावर कुळ म्हणून मागासवर्गीय कुटुंबीयांची नावे नोंदविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जमिन ही देवस्थान इनाम असल्याने त्यांना शासनाच्या पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास योजना व अन्य योजनांचा लाभ मिळत नसल्यामुळे अंतर्गत पायवाटा व इतर सोयीसुविधांपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त वस्तीमधील आजारी व्यक्तींना रुग्णालयात नेण्यासाठी अनेक गैरसायींना सामारे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरमधील मागासवर्गीयांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर या देवस्थान इनाम जमिनीवरील मागासवर्गीय कुटुंबियांची कुडाळ तालुक्यात स्वत:च्या मालकीची जागा असल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदरहू जमीन देवस्थान इनाम असल्याने शासनाच्या पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास इ. वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात अडचणी येतात. तथापि, पायवाटा, रस्ते, गटार इ. सुविधा स्थानिक नगर पंचायतीमार्फत उपलब्ध करून दिल्या जातात.

(४) हे अंशत: खरे आहे.

सदर वस्तीतील एकूण ७० कुटुंबांपैकी १४ कुटुंबांना अंतर्गत रस्ता नसल्याने आजारी व्यक्तींना रूग्णालयात घेऊन जाण्याकरीता अन्य पर्यायी मार्गाचा वापर करतात.

(५) सदरहू जमिनींच्या ७/१२ सदरी मूळ मालकी ही श्री. देव कुडाळेश्वर, लक्ष्मी केळबाई व भैरव वहिवाट दे.सु. पेटा, कुडाळ यांची असून कुळ म्हणून संबंधित मागासवर्गीय यांच्या नोंदी आहेत. त्यामुळे शासनाच्या योजनांचा वैयक्तिक लाभ देणे अडचणीचे ठरते. तथापि, सदर देवस्थान जमिनी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापूर यांच्या अधिपत्याखाली असल्याने पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरमधील मागासवर्गीयांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्याबाबत परवानगी दिल्यास संबंधित मागासवर्गीयांना शासकीय योजनांचा लाभ देता येईल.

त्यानुषंगाने सदर क्षेत्र नगरपंचायत, कुडाळ अंतर्गत येत असल्याने नगरपंचायत, कुडाळ यांनी पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीकडे परवानगी देण्याबाबत विचारणा केलेली आहे.

-----------------

## राज्यातील कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(१८) * २३९२४ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित धोरण राबविण्यासाठी निवडण्यात आलेल्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी (CEO) रुजू होण्यास नकार दिल्यामुळे सदर प्रकल्प सहा महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जून, २०२५ मध्ये पारदर्शक निवड प्रक्रिया पार पडल्यानंतरही प्रशासकीय स्तरावरील अटींच्या पूर्ततेअभावी पात्र तज्ज्ञांनी पदभार स्वीकारण्यास नकार दिला असून या पदाचा अतिरिक्त कार्यभार उप सचिवांकडे सोपवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, 'एआय'च्या अंमलबजावणीसाठी शासनाने ५०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली असतानाही केवळ धोरण आणि तांत्रिक मनुष्यबळाअभावी या निधीचा विनियोग संथ गतीने होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुषंगाने एआय (AI) अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची निवड करून एआय प्रकल्प गतीने कार्यान्वित करण्यासाठी तसेच भविष्यकाळात अशा महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी तज्ज्ञांच्या नियुक्ती प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

(२) निवड प्रक्रियेअंती ५ तज्ञांनी पदभार स्विकारण्यास नकार दिला ही बाब खरी नाही. उप सचिवांकडे व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार देण्यात आलेला आहे.

(३) सदर योजनेसाठी सन २०२५-२९ या कालावधीसाठी एकूण रु.५०० कोटींची तरतूद जाहीर केलेली आहे. सन २०२५-२६ साठी रु.३०.०० कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. धोरणांतर्गत अन्य तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती करून या धोरणाची अंमलबजावणी समाधानकारकरित्या सुरू आहे.

(४) लागू नाही.

(५) लागू नाही.

(६) लागू नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील जैविक खत सोसायट्या शेतकऱ्यांना चढया भावाने खत विक्री करत असल्याबाबत

**(१९) * २७२७६ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात अनेक जैविक खतांच्या सोसायट्या शेतकऱ्यांना थेट किरकोळ विक्रीकरिता परवाना देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा उपनिबंधक नांदेड यांनी सन २०१० ते २०२५ पर्यंत जैविक खत परवाना दिलेल्या सोसायट्यांनी ठरवून दिलेल्या बायलॉजनुसार खत विक्री केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात खत सोसायट्यांनी शेतकऱ्यांना किरकोळ विक्री न करता काही ठराविक कृषि निविष्ठा विक्री केंद्रातून विक्री केली जाते तसेच रॅकपॉईंट वरून कृत्रिम टंचाई निर्माण करून चढ्या भावाने विक्री होत असल्याच्या अनेक तक्रारी जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक यांचेकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यात इफको कंपनीच्या अधिकृत डिलरला होलसेल विक्री करण्याची परवानगी दिली नसतानाही इफको डिलर होलसेल विक्री करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त जिल्ह्यातील दोषी खत सोसायट्यांवर तसेच जिल्हा उपनिबंधक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे :** (१) होय. नांदेड जिल्ह्यात ११ जैविक खत सोसायट्यांनी रासायनिक खत विक्री परवाना घेतला आहे.

(२) यासंदर्भात तपासणी करण्यात येत आहे.

(३) माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयात १ तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय भरारी पथकानमार्फत तपासणी केली आहे. सदर भरारी पथकाने तपासणी करून दिलेल्या अहवालानुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा परवाना अधिकारी यांनी ४ संस्थेचे खत विक्री परवाना निलंबित केले आहेत.

(४) इफको सहकारी संस्थांमार्फत रासायनिक खतांची विक्री करतो. प्रामुख्याने तो त्यांच्या सभासद संस्थांना खते देतो. सदर संस्था त्यांचेकडे असलेल्या परवान्यानुसार विक्री करतात.

(५) याबाबत आयुक्त (कृषी) यांना प्राथमिक चौकशी करुन तद्अनुषंगाने आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठीचा प्रस्ताव पाठविण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे, कळवा व मिरारोड येथील नोंदणी कार्यालय क्रमांक ९ मधील सह दुय्यम निबंधक यांनी शासनाची केलेली फसवणूक**

**(२०) * २३१२८ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कळवा व मिरारोड येथील नोंदणी कार्यालय क्रमांक ९ मधील वर्ग २ चे सह दुय्यम निबंधक व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ ते जुलै, २०२५ या तीन वर्षाच्या कालावधीत विकासकरार, मुख्यत्यारपत्र आदी करारनामे नोंदणी करताना दस्तकर्त्यांना १२ कोटी २४ लाख ६० हजार रुपयांचा आर्थिक फायदा करून शासनाची फसवणूक केल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळवा येथील नोंदणी कार्यालयात ४ दस्त नोंदणीच्या तपासणीत बाजारमूल्य निश्चित केले असताना ३८ लाख ४३ हजार ८९८ रुपये मुद्रांक शुल्क, तर १४ हजार ६४० रुपये नोंदणी शुल्क कमी आकारले गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विवरणपत्रात विकसन करारनाम्याच्या ३ दस्तवर माहे मार्च ते मे, २०२५ मध्ये ३० लाख ५७ हजार ३२५ रुपये कमी मुद्रांक शुल्क आकारून त्याची नोंद केली नसून याच कालावधीत शासनाचा ६९ लाख १५ हजार ८६३ रुपयांचा मुद्रांक शुल्क बुडविल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तसेच बेकायदा दस्त नोंदणी करणारे ग्राहक यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१),(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी श्री.जयंत जोपळे, तत्का. सह दुय्यम निबंधक वर्ग-२, ठाणे क्र.९ यांना शासनाच्या दिनांक ११ डिसेंबर, २०२५ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोहाड (ता.नरखेड, जि.नागपूर) येथील नागरिकांना भूमी अभिलेख त्रुटीमुळे येणाऱ्या समस्या**

**(२१) * २९६२१ श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाड (ता.नरखेड, जि.नागपूर) ह्या शहरातील वर्धा नदीला आलेल्या महापुरामुळे बाधित झालेल्या नागरिकांचे पुनर्वसन करण्यात आले असून त्यावेळी महसूल विभागामार्फत पुनर्वसित नागरिकांना वैधपणे रहिवासी भूखंडांचे वितरण करुन सनदपट्टे देखील वितरित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूमी अभिलेख विभागाने सिटी सर्व्हे तयार केला असून स्थानिक नागरिकांनी मिळविलेले सनदपट्टे असतानाही भोगवटादारांच्या नावाऐवजी ‘महाराष्ट्र शासन’ अशी नोंद करण्यात आल्यामुळे अनेक नागरिकांना आजही आपल्या भूखंडाच्या मालकी हक्काची अधिकृत नोंद मिळू शकली नसल्याने नागरिकांना बँकेकडून कर्ज मिळत नाही, भूखंड कायदेशीर गहाण ठेवता येत नाही व खरेदी-विक्री करताना अनेक अडचणी येणे तसेच शासकीय योजनांचा लाभ घेता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने भोगवटादारांच्या नावे शहराच्या सिटी सर्व्हे पत्रिकेत नाव नोंदवण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मौजा मोहाड येथील नगर भूमापनावेळी "अ" सत्ता प्रकाराच्या १४८०, "ब" सत्ता प्रकाराच्या ३७०, "क" सत्ता प्रकाराच्या ८, "ड" सत्ता प्रकाराच्या ५, "इ" सत्ता प्रकाराच्या १९, "फ" सत्ता प्रकाराच्या १७७, "ग" सत्ता प्रकाराच्या ३००, "आय" सत्ता प्रकाराच्या २७ व शेतीकडे ७२२ अशा एकूण ३१०८ मिळकती तयार करण्यात आल्या आहेत.

सदर नगर भूमापनाबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, नागपूर या कार्यालयाकडून नगर परिषद, मोहाड येथे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ व दिनांक ४ नोव्हेंबर, २०२५ रोजी विशेष शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरात प्राप्त तक्रारींबाबत नियमानुसार कायर्वाही करण्यात आली आहे. तसेच उप अधीक्षक, भूमी अभिलेख, नरखेड या कार्यालयाकडून नगर परिषद मोहाड येथे दर गुरूवारी शिबीर आयोजित करून त्यामध्ये प्राप्त तक्रारींबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बांबू रोप खरेदीच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(२२)** * **२५७००  श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात बांबू लागवडीची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री यांनी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बांबू रोप खरेदी प्रक्रिया प्रत्यक्षात राबवतांना त्यात मोठया प्रमाणात त्रुटी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर त्रुटी आढळून येण्यापूर्वीच आसामच्या नॉर्थ ईस्ट नर्सरी ॲण्ड सीड्स हाऊस कंपनीकडून बांबूची रोपे खरेदी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बांबू रोप खरेदी प्रक्रियेत त्रुटी असल्याने शासनाला सदर कंपनीला नुकसान भरपाई द्यावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त बांबू रोपाच्या निविदा प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहारप्रकरणी जबाबदार असणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक :** (१) होय.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

सन २०२३-२४ मध्ये खरेदी केलेल्या बांबू रोपांच्या पुरवठादार यांनी त्यांचे देयके न मिळाल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.७७६/२०२५ दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ च्या सुनावणीनुसार पुरवठादारास वापरलेल्या बांबू रोपांसाठी रु. ६८,९३,५२५/- इतकी रक्कम अदा करण्याचे तसेच उर्वरीत बांबू रोपांचे DNA profile test करीता येणारा खर्च समप्रमाणात करण्याबाबत आदेशीत केले. त्यानुसार पुरवठादारास रु.६८,९३,५२५/- इतकी रक्कम व DNA profile test करणेकरीता रु.१०,९१,५००/- (५० टक्के शासन हिस्सा) इतकी रक्कम शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर यांना अदा

करण्यात आली आहे. या प्रकरणी वापरलेल्या बांबु रोपांची रक्कम अदा केली असल्यामुळे कंपनीला नुकसान भरपाई द्यावी लागणार आहे, असे म्हणणे उचित होणार नाही.

(५) नॉर्थ ईस्ट नर्सरी ॲण्ड सिड्स हाऊस, आसाम यांना ३५ लक्ष बांबू रोपांचा पुरवठा करणेसाठी ई-निविदेव्दारे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३ अन्वये कार्यारंभ आदेश दिला होता. सदर निविदा प्रक्रिया राबविताना शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर, २०१६ च्या तरतूदींचे उल्लंघन तसेच खरेदी प्रक्रीया सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने व वित्तीय अधिकार मर्यादेनुसार करण्यात आली नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून आल्याने दिनांक ३० मे, २०२४ रोजीच्या अ.शा. पत्रान्वये तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), पुणे यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. त्याअनुषंगाने तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांनी दिनांक २१ जून, २०२४ च्या पत्रान्वये सादर केलेला खुलासा व त्यासंदर्भात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), नागपूर यांनी दिनांक ३१ जुलै, २०२४ अन्वये दिलेले अभिप्राय विचारात घेऊन शासनाच्या दिनांक ४ फेब्रुवारी, २०२६ च्या पत्रान्वये तत्कालीन प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे व इतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने दोषारोपपत्रे मागविण्यात आली आहेत. सदर दोषारोपपत्रे प्राप्त झाल्यानंतर शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरू करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.